दाखल ता. – १५/१२/२०२२
नोंदणी ता. – १५/१२/२०२२
निकाल ता. – १२/०६/२०२६
कालावधी – ३वर्ष ५म २७दि

**कवठेमहांकाळ येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात, तालुका कवठेमहांकाळ, जि. सांगली.**

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती नुतन सचिन कदम)**

**फौ.कि.अर्ज क्र. १४३/२०२२**
**निशाणी क्र. १८**

१. सौ. ऐश्वर्या स्वप्नील बेडगे, **अर्जदार**
वय २४ वर्षे, धंदा– घरकाम,
रा. व्दारा रेश्मा गणपती मासाळ,
रा. पाण्याची टाकी, नरघोल रोड,
कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ,
जि.सांगली.

**विरुध्द**

१. स्वप्नील धोंडीराम बेडगे
वय ३० वर्षे, व्यवसाय – हातमाग

२. धोंडीराम शंकर बेडगे
वय ५७ वर्षे, धंदा–व्यवसाय

३. सौ. मिना धोंडीराम बेडगे,
वय ५१ वर्षे, व्यवसाय – घरकाम,

४. सायली धोंडीराम बेडगे,
वय २३ वर्षे, धंदा– शिक्षण व घरकाम,
सर्व रा. १८/९०३,स्टेशन रोड, जवाहर नगर,
इचलकरंजी, ता. हातकणंगले,जि. कोल्हापूर. **जाबदार**

**अर्ज –महिलांचा घरगुती जुलुमापासून संरक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००५ (२००५ चा ४३ वा) चे कलम १२,१७,१८,१९, २०,२२ प्रमाणे.**

.............................................................................................

अर्जदारातर्फे विधिज्ञ : श्री. यु.व्ही.पाटील
जाबदार क्र. १ ते ४ तर्फे : एकतर्फा.

.............................................................................................

**न्या य नि र्ण य**

(पारीत दिनांक १२/०६/२०२६)

०१. अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १७, १८, १९, २०, २२ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. **अर्जदार यांच्या अर्जाचा सारांश पुढील प्रमाणे :**

अर्जदार व जाबदार क्र. १ हे नात्याने पती पत्नी असून त्यांचा विवाह दि. १७.०४.२०२१ रोजी इचलकरंजी येथे झाला आहे. विवाहामध्ये अर्जदार हिचे आईवडीलांनी व भावांनी जाबदार क्र.१ यांना सोन्याचे दागीने, अर्जदार हिस मंगळसूत्र, गंठण वगैरे दागीने घालून तसेच संसारसेट असा एकूण पाच ते सहा लाख

रुपये लग्नासाठी खर्च केला. लग्नानंतर जाबदार यांनी अर्जदार यांना विनाकारण टोचून बोलणे, कामांमध्ये चुका काढणे, उध्दटपणे बोलणे अशी कृत्ये चालू केली. जाबदार यांनी अर्जदार यांच्या वडिलांकडे १० लाख रुपयांची मागणी केली. त्याप्रमाणे त्यांनी १० लाख रुपये जाबदार यांना दिले. त्यानंतर जाबदार यांनी पुन्हा ५० लाख रुपयांची मागणी अर्जदार यांच्याकडे केली. त्यावेळी अर्जदार हिने पैसे देण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे जाबदार यांनी अर्जदारास शिवीगाळ करुन धमकी दिली. जाबदार क्र. १ हे रोज रात्री दारु पिवून येवून अर्जदार हिस त्रास देत असत. दि. २८.०४.२०२१ रोजी अर्जदार यांची नणंद व सासू यांनी अर्जदाराच्या अंगावरील मौल्यवान दागीने काढून घेतले व अर्जदार यांना माहेरी पाठविले.

०३. अर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर जाबदार यांनी मध्यस्थांमार्फत अर्जदार हिच्या आईवडीलांना निरोप पाठविला की तुमची मुलगी नको आहे, ती शरीराने अपंग आहे तसेच इतरही आरोप केले. त्यानंतर मध्यस्थी लोकांमार्फत बैठक झाली परंतु त्यांच्यातील वाद मिटला नाही. अर्जदाराने पुढे असे कथन केले की, अर्जदाराच्या अपंगत्वाबाबत इचलकरंजी येथील डॉ.सुरेश नेगांधी व डॉ. राजीव नेगांधी यांच्याकडे अर्जदाराची तपासणी केली असता अर्जदारास अपंगत्व नसल्याबाबत डॉक्टरांनी अहवाल दिला. सदरचा अहवाल जाबदार यांच्या कुटुंबियांना दाखविण्यात आला. परंतु जाबदारांनी अहवालाची फाईल फेकून दिली व शिवीगाळी केली. तसेच अर्जदार व तिच्या भावांना जिवे मारण्याची धमकी दिली. अर्जदार हिच्या वडिलांनी अर्जदार हिस जाबदार यांनी नांदवून घेण्याबाबत भरपूर प्रयत्न केला परंतु जाबदार यांनी अर्जदार यांचा शाररिक, मानसिक व आर्थीक छळ सुरुच ठेवला व अर्जदारास नांदविण्यास नकार दिला.

०४. अर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, जाबदार क्र. १ यांच्या पॉवरलूममध्ये १० ते १५ कामगार आहेत. पॉवरलूमच्या १८ च्या पुढे मशीन्स असून एका मशीनची किंमत ३० ते ४० लाखापेक्षा जास्त आहे. जाबदार क्र. १ यास दरसाल

५० ते ६० लाख रुपये निव्वळ नफा मिळतो. तसेच जाबदार क्र. १ यांचा पीव्हीसी पाईप निर्मितीचा कारखाना असून त्यापासून त्यांना दरमहा ३ लाख रुपये निव्वळ नफा मिळतो. एकंदरीत जाबदार क्र. १ चे दरसाल उत्पन्न ९० ते ९५ लाखापेक्षा जास्त आहे. जाबदार क्र. २ यांचा प्लॉटींगचा व्यवसाय असून त्यांना दरसाल सुमारे ३ ते ४ कोटी रुपये उत्पन्न मिळते. जाबदार क्र. ३ या माजी नगरसेविका आहेत. जाबदार यांचेकडे चार चाकी वाहन, ३ मजली बंगला आहे. एकंदरीत जाबदार यांची आर्थीक परिस्थीती अत्यंत श्रीमंतीची आहे.

०५. अर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, तिची आर्थीक परिस्थीती हलाखीची असून ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. अर्जदारास आश्रीताचे जीवन जगावे लागत आहे. अर्जदार कवठेमहांकाळ येथे भाडयाच्या घरामध्ये रहात असून त्यापोटी अर्जदार दरमहा १५ हजार रुपये भाडे देत आहे. तसेच अर्जदाराचे वडील वारंवार आजारी असतात, त्यांना कोणत्याही प्रकारचा कामधंदा होत नाही. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, जाबदार क्र.१ ने अर्जदारांच्या पालनपोषणाची कोणतीच जबाबदारी घेतलेली नाही. सबब जाबदार यांनी अगर तर्फे इसमांनी अर्जदार यांच्यावर घरगुती जुलुम करु नयेत अथवा तशा कोणत्याही कृत्यास प्रोत्साहन, मदत, सहाय्य करु नये अशी जाबदार यांना सक्त मनाई करण्यात यावी व पोलीस संरक्षण देण्यात यावे. तसेच जाबदार यांनी अर्जदाराच्या निवासस्थानाची सोय करावी किंवा दरमहा महिना पंधरा हजार रुपये घरभाडे म्हणून दयावे, जाबदार यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्यामुळे कारण नसताना अर्जदार यांना माहेरी रहावे लागत आहे त्यामुळे त्यासाठी जाबदार यांनी ८०,०००/- रुपये दयावेत, अर्जदारास नुकसानभरपाई म्हणून चार लाख रुपये देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

०६. प्रस्तुत अर्जातील जाबदार क्र. १ ते ४ यांनी अर्जाची नोटीस स्वीकारली नाही तसेच ते हजरही झाले नाहीत. त्यामुळे सदरच्या अर्जात जाबदार क्र. १ ते ४ यांच्या विरुध्द दि. २५.०६.२०२४ रोजी एकतर्फा आदेश करण्यात आला

आहे.

०७. प्रस्तुतचा अर्ज व कागदपत्रांचे अवलोकन केले. तसेच अर्जदार यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

०८. प्रस्तुत खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यावरील निष्कर्ष सविस्तर कारणीमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांनी हे सिध्द केले आहे काय की, जाबदार यांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला व कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये गुन्हा केला आहे ? | होकरार्थी |
| २. | अर्जदार त्यांच्या मागणीप्रमाणे कौटुंबिक हिसाचारापासुन अर्जदार यांच्या संरक्षणाचा आदेश, घरभाडयाची रक्कम, पोटगी रक्कम व मानसिक व शाररिक त्रासासाठी नुकसानभरपाई मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| ३. | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## : का र ण मि मां सा :

०९. आपल्या अर्जातील कथनाला पुष्टी देण्यासाठी अर्जदार यांनी स्वतःला निशाणी क्र. ११ वर तपासले आहे. तसेच अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ म्हणून दिलीप बाबासो सूर्यवंशी यांना नि.क्र. १२ व सा.क्र. ३ म्हणून सौ. जयश्री अरुण भगत यांना नि.क्र. १३ वर व सा.क्र. ४ म्हणून अरुण कुंडलिक भगत यांना नि.क्र.१४ वर तपासले आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र. १५ अन्वये पुरावा बंद पुरसिस दाखल

करून आपला पुरावा बंद केला असून अभीलेखावर जाबदार क्र. १ यांचे आजोबा व आई यांच्या मिळकतीचे उतारे दाखल केले आहेत.

**<u>मुद्दा क्र. १ करीता :–</u>**

१०. उभय पक्षांच्या पुराव्याकडे जाण्यापुर्वी घरगुती हिंसाचाराची व्याख्या विचारात घेणे आवश्यक ठरते.

कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम ३ अन्वये कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या देण्यात आलेली आहे.

*कलम ३ कौटुंबिक हिंसाचार – या कायद्याच्या उद्देशाने कोणतेही कृत्य, चुक किंवा कर्म किंवा वर्तणुक हे घरगुती हिंसाचार म्हणुन गणले जाईल जर ते*

*अ) पिडीत व्यक्तीचे मानसिक किंवा शारिरिक आरोग्य, सुरक्षितता, जिवन, अशक्तपणा किंवा कल्याण, ईजा पोहोचवते किंवा धोक्यात आणते किंवा तसे करण्याची प्रवृत्ती करते आणि त्यात शारिरिक शोषण, लैंगिक शोषण, मौखिक आणि भावणिक शोषण आणि आर्थिक शोषण यांचा समावेश आहे किंवा*

*ब) पिडीत व्यक्तीला किंवा तिच्याशी संबंधीत इतर कोणत्याही व्यक्तीला हुंडा किंवा इतर मालमत्तेची किंवा मौल्यवान सुरक्षिततेची कोणतीही कायदेशिर मागणी पुर्ण करण्यासाठी जबरदस्ती करण्याच्या उद्देशाने तिला त्रास देतो, हाणी पोहोचवतो, दुखापत करतो किंवा धोक्यात आणतो किंवा*

*क) खंड अ किंवा खंड ब मध्ये नमुद केलेल्या कोणत्याही वर्तणामुळे पिडीत व्यक्तीला किंवा तिच्याशी संबंधीत कोणत्याही व्यक्तीला धमकी देण्याचा परिणाम होतो किंवा*

*ड) अन्यथा पिडीत व्यक्तीला शारिरिक किंवा मानसिक दुखापत करते किंवा हानी पोहोचवते.*

११. कौटुंबिक हिंसाचाराबाबतची वरील कायदेशिर तरतूद विचारात घेवून

अभीलेखावरील अर्जदार यांच्या पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदार यांनी आपल्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार व जाबदार क्र. १ हे नात्याने पती पत्नी असून त्यांचा विवाह दि. १७.०४.२०२१ रोजी इचलकरंजी येथे झाला आहे. विवाहामध्ये अर्जदार हिचे आईवडीलांनी व भावांनी जाबदार क्र.१ यांना सोन्याचे दागीने, अर्जदार हिस मंगळसूत्र, गंठण वगैरे दागीने घालून तसेच संसारसेट असा एकूण पाच ते सहा लाख रुपये लग्नासाठी खर्च केला. लग्नानंतर जाबदार यांनी अर्जदार यांना विनाकारण टोचून बोलणे, कामांमध्ये चुका काढणे, उध्दटपणे बोलणे अशी कृत्ये चालू केली. जाबदार यांनी अर्जदार यांच्या वडिलांकडे १० लाख रुपयांची मागणी केली. त्याप्रमाणे त्यांनी १० लाख रुपये जाबदार यांना दिले. त्यानंतर जाबदार यांनी पुन्हा ५० लाख रुपयांची मागणी अर्जदार यांच्याकडे केली. त्यावेळी अर्जदार हिने पैसे देण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे जाबदार यांनी अर्जदारास शिवीगाळ करुन धमकी दिली. जाबदार क्र. १ हे रोज रात्री दारु पिवून येवून अर्जदार हिस त्रास देत असत. दि. २८.०४.२०२१ रोजी अर्जदार यांची नणंद व सासू यांनी अर्जदाराच्या अंगावरील मौल्यवान दागीने काढून घेतले व अर्जदार यांना माहेरी पाठविले.

१२. अर्जदार यांनी आपल्या पुराव्यात असे कथन केले आहे की, अर्जदार यांच्या माहेरच्या लोकांनी अर्जदार यांना सासरी पाठविण्यासाठी जाबदार यांच्याबरोबर बैठक घेतली असता अर्जदार ही अपंग आहे व त्यांना तिला नांदवावयाचे नाही असे त्यांनी सांगितले. अर्जदार ही अपंग नसल्याबाबतचे वैदयकीय प्रमाणपत्र वैदयकीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन जाबदार यांना दाखविले तरी देखील त्यांनी सदर वैदयकीय प्रमाणपत्र नाकारले व अर्जदार हिला नांदण्यास नेण्यास नकार दिला. अर्जदार यांनी पुराव्यातील कथनाला पुष्टी देण्यासाठी त्यांचे वडील दिपक बाबासो सूर्यवंशी, त्यांची मावशी सौ. जयश्री अरुण भगत व त्यांचे काका अरुण पुंडलिक भगत यांना तपासले आहे. सदर तिनही साक्षीदारांनी अर्जदार हिच्या पुराव्यातील कथनाला

पुष्टी दिली आहे. जाबदार यांना सदर प्रकरणाची नोटीस पाठविल्यानंतर त्यांनी सदर नोटीस स्वीकारली नाही व प्रस्तुत प्रकरणात हजर होवून आपले कोणतेही म्हणणे अभीलेखावर दाखल केले नाही.

१३. अर्जदार हिने आपल्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की ती व जाबदार क्र. १ हे पती पत्नी असून जाबदार क्र. २ ते ४ हे जाबदार क्र. १ यांच्या घरातील लोक आहेत. जाबदार हे प्रस्तुत प्रकरणामध्ये हजर झाले नाहीत. त्यामुळे अर्जदार व जाबदार यांच्यातील नातेसंबंध त्यांनी मान्य करण्याचा किंवा अमान्य करण्याचा प्रश्न उदभवलेला नाही. अर्जदार यांनी त्यांच्यातील नातेसंबंध सिध्द करण्यासाठी अभीलेखावर त्यांच्या विवाहाची पत्रीका व विवाहातील फोटो दाखल केले असले तरी सदर कागदोपत्री पुरावा अर्जदार यांनी सिध्द केलेला नाही. त्यामुळे अर्जदार व जाबदार यांच्यातील नातेसंबंधाबाबत अर्जदार व इतर साक्षीदार यांचा तोंडी पुराव्याव्यतिरिक्त इतर कागदोपत्री पुरावा अभीलेखावर नाही. असे असले तरी कोणतीही स्त्री विनाकारण एखादया व्यक्तीवर ती व्यक्ती तिचे पती व सासरचे लोक आहेत म्हणून त्यांच्याविरुध्द खोटी केस करणार नाही. त्यामुळे ज्याअर्थी अर्जदार व इतर साक्षीदार हे अर्जदार व जाबदार यांच्या नातेसंबंधाबाबत आपल्या पुराव्यामध्ये कथन करीत आहेत त्याअर्थी अर्जदार व जाबदार क्र. १ हे पतीपत्नी असल्याचे दिसून येत आहे. तसेच त्यांच्या पुराव्यावर संशय घेण्याचे कोणतेही कारण अभीलेखावर आलेले नाही. यास्तव अर्जदार ही जाबदार क्र. १ यांची पत्नी व इतर जाबदार हे त्यांचे नातेवाईक असल्याचे अर्जदार यांच्या पुराव्यावरुन सिध्द होत आहे.

१४. अर्जदार यांनी आपल्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की जाबदार हे अर्जदार हिला माहेरहून १० लाख रुपये घेवून ये तसेच सदर पैशाची पूर्तता अर्जदार हिच्या नातेवाईकांनी केल्यानंतर पुन्हा माहेरहून ५० लाख रुपये घेवून ये अशी मागणी केली असल्याचे कथन केले आहे. तसेच जाबदार यांनी अर्जदार हिला टोचून बोलणे, कामात चुका काढणे, तिच्याशी उध्दटपणे बोलणे असे करुन तिला

मनसिक त्रास दिला.तसेच जाबदार क्र. १ यांनी रात्री दारु पिवून अर्जदार हिला तू सोने कधी आणणार आहे, घरुन पैसे घेवून ये असे म्हणून तिला मारण्यासाठी अंगावर धावून जात असत. त्यानंतर दि. २८.०४.२०२१ रोजी अर्जदार ही माहेरी येताना अर्जदार हिची सासू व नणंद यांनी गोड बोलून अर्जदार हिच्या अंगावरील मौल्यवान दागीने काढून घेतले व अर्जदाराला माहेरी पाठविले. त्यानंतर अर्जदाराला त्यांनी कधीही परत नेले नाही. अर्जदार हिच्या सदर कथनाला इतर साक्षीदार यांनी देखील पुष्टी दिली आहे. तसेच सर्व साक्षीदार यांनी आपल्या पुराव्यामध्ये त्यांनी अर्जदार हिला सासरी नांदण्यासाठी पाठविण्याचा प्रयत्न केला परंतु जाबदार यांनी अर्जदार हिला नांदण्यासाठी परत नेले नाही असे कथन केले आहे. सदर साक्षीदारांच्या पुराव्यातील कथनाला पुष्टी देण्यासाठी अभीलेखावर कागदोपत्री पुरावा नसला तरी हे विचारात घेणे आवश्यक ठरते की कौटुंबिक हिंसाचार हा चार भिंतीच्या आत झालेला असतो त्यामुळे अर्जदार हिच्या तोंडी पुराव्याव्यतिरिक्त इतर पुरावा अभीलेखावर येणे शक्य नसते. अशावेळी साक्षीदारांचा तोंडी पुरावा व त्या संलग्न पक्षकारांच्या वागणूकीचे अवलोकन करणे आवश्यक ठरते. यास्तव अभीलेखावरील पुराव्यावरुन उभय पक्षाच्या वर्तणुकीबाबत विचार करणे आवश्यक ठरते.

१५. अर्जदार व जाबदार क्र. १ यांचा विवाह दि. १७.०४.२०२१ रोजी इचलकरंजी येथे झाला. त्यानंतर अर्जदार ही दि २८.०४.२०२१ रोजी माहेरी गेली होती. त्यानंतर अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज हा दि. १५.१२.२०२२ रोजी दाखल केलेला आहे. म्हणजे अर्जदार हिने परत नांदण्यासाठी जाण्यास दिड वर्षापेक्षा जास्त कालावधी वाट पाहिलेली आहे व त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे असे दिसून येते. याउलट जाबदार यांना नोटीस पाठविल्यानंतर देखील ते प्रस्तुत प्रकरणाची नोटीस घेण्यास नकार देत आहेत. म्हणजे त्यांना अर्जदारासोबत नाते टिकविण्याचा किंवा त्यांची बाजू मांडण्याचा कोणताही प्रयत्न त्यांनी केलेला नाही. यावरुन जाबदार यांचे वागणे हे नसैर्गिक वर्तणुकीच्या विरुध्द असल्याचे दिसून येत

आहे. तसेच अर्जदार दि. २८.०४.२०२१ रोजीपासून तिच्या वैवाहिक सुखाला मुकली आहे. विवाहानंतर वैवाहिक सुख मिळणे हा देखील अर्जदार हिचा अधिकार होता. परंतु अर्जदार हिला जाबदार यांनी नांदविले नसल्यामुळे तिला सदर अधिकारास मुकावे लागले आहे हा देखील अर्जदार हिला जाबदार यांच्या वर्तणुकीमुळे झालेला मानसिक त्रास आहे असे समजणे न्यायोचित ठरते. यास्तव अभीलेखावरील साक्षीदारांचा पुरावा व उभय पक्षांची वर्तणुक विचारात घेता जाबदार यांनी अर्जदार हिला मानसिक त्रास देवून व अर्जदार हिच्या माहेरच्यांच्याकडून पैशाची मागणी करुन अर्जदार हिचा कौटुंबिक छळ केला असल्याचे सिध्द होत आहे. सबब मुददा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी घेण्यात येत आहे.

**मुददा क्र. २ करीता**

१६. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जामध्ये तिच्या घरभाडयासाठी १५ हजार व पोटगीसाठी ८० हजार व मानसिक त्रासाच्या नुकसान भरपाईसाठी चार लाख रुपयांची मागणी केली आहे.अर्जदार यांनी आपल्या पुराव्यामध्ये जाबदार यांच्या परिस्थीतीबाबत वर अर्जातील कथनाप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे कथन केले असले तरी जाबदार यांच्या आर्थीक परिस्थीतीबाबत अर्जदार यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा अभीलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदार हिने जाबदार क्र. १ यांच्या आजोबांचे व आईच्या मिळकतीबाबतचे उतारे अभीलेखावर दाखल केले असले तरी अर्जदार हिच्या राहण्याची व पोटगीची सोय करणे ही जाबदार क्र. १ यांची जबाबदारी आहे. जाबदार क्र. १ यांच्या उत्पन्नाबाबतचा कोणताही पुरावा अभीलेखावर दाखल केलेला नाही. तसेच अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नसल्याचे आपल्या पुराव्यात कथन केले आहे. तसेच अर्जदार हिच्या दैनंदिन जीवनशैलीबाबत देखील कोणतेही कथन आपल्या पुराव्यामध्ये केलेले नाही. असे असले तरी अर्जदार ही जाबदार क्र. १ ची पत्नी असून वर नमूद केल्याप्रमाणे जाबदार यांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिध्द झाले असल्यामुळे सदर जाबदार क्र. १ यांची अर्जदार हिच्या

राहण्याची व पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे. सध्याची महागाई व सर्वसाधारणपणे एका व्यक्तीसाठी लागणारा खर्च विचारात घेवून त्यानुसार अर्जदार हिची राहण्याची व पालनपोषणाची सोय करणे आवश्यक ठरते. यास्तव अर्जदार ही माहेरी रहात असल्याने तिच्या राहण्यासाठी घरभाडे म्हणून दरमहा तीन हजार रुपये व पालन पोषणासाठी दरमहा तीन हजार रुपये देणे न्यायोचित ठरणार आहे.

१७. अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये त्यांच्या मानसिक त्रासासाठी चार लाख रुपये मिळण्याची मागणी केली आहे. अर्जदार हिने पुराव्यात कथन केल्याप्रमाणे जाबदार यांनी तिला मानसिक त्रास दिलेला आहे. तसेच अर्जदार ही विवाहानंतर दि. २८.०४.२०२१ रोजी पासून माहेरी रहात असल्यामुळे विवाह सुखापासून वंचित राहिली आहे. अशाप्रकारे अर्जदार हिला मानसिक त्रास झाला असल्याने सदर मानसिक त्रासाबाबत अर्जदार हिला नुकसान भरपाई देणे आवश्यक ठरते. यास्तव अर्जदार हिला मानसिक त्रासासाठी २० हजार रुपये नुकसान भरपाई देणे न्यायोचित ठरते.

१८. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये जाबदार यांच्याविरुध्द जाबदार यांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार करु नये अथवा तशा कोणत्याही कृत्यांना मदत सहाय्य करु नये अशी सक्त मनाई करण्यात येवून पोलीस संरक्षण मिळावे अशी विनंती केली आहे. परंतु अर्जदार ही माहेरी रहात होती. जाबदार हे अर्जदार हिच्या माहेरी येवून तिला त्रास देत असल्याबाबत कोणतेही कथन अर्जदार हिने आपल्या पुराव्यात केले नाही किंवा तसा कोणताही पुरावा अभीलेखावर दाखल केलेला नाही. यास्तव अर्जदार हिच्या मागणीप्रमाणे जाबदार यांच्याविरुध्द संरक्षण आदेश देण्याची आवश्यकता नाही. सबब मुददा क्र. २ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करिता</u>**

१९. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार हिने जाबदार यांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याची बाब सिध्द केल्याने ती अनुतोष मिळण्यास पात्र आहे. यास्तव मुद्दा

क्र. १ व २ चे निष्कर्ष विचारात घेवून त्या अनुषंगाने मुद्दा क्र. ३ साठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदार क्र. १ यांनी अर्जदार हिस राहण्यासाठी घरभाडे दरमहा तीन हजार रुपये व पोटगी म्हणून दरमहा तीन हजार रुपये अर्ज दाखल तारखेपासून दयावा.

३ अर्जदार हिला मानसिक त्रासासाठी २० हजार रुपये नुकसान भरपाई दयावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

KADAM NUTAN SACHIN
Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2026.06.12 15:34:15 +0530

स्थळ:–कवठेमहांकाळ

(एन.एस.कदम)

दिनांक:– १२/०६/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधीकारी, कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file judgment is same, word to word, as per the original judgment.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date -12.06.2026
Order signed by the
Presiding Officer on -12.06.2026
Order uploaded on 12.06.2026